राज्यातील नगरपरिषदांसाठी बांधकाम परवानगी देण्याकरिता संगणकीय आज्ञावली तयार करणेबाबत **(Building Plan Management System)** **(राज्य सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प).**

# महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई

**शासन निर्णय**

क्रमांक : टिपीएस/१८१५/५२७/प्र.क्र.१३९/१५/नवि-१३

दिनांक : १६/०३/२०१७

**प्रस्तावना:-**

केंद्र शासनाचे Ease of Doing Business अंतर्गत राज्य सरकारचा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून मा.मुख्यमंत्री महोदय यांनी राज्यातील नगरपरिषदा / महानगरपालिका व सबंधित नियोजन प्राधिकरणे यांच्याकडील इमारतींच्या बांधकामासाठी लागणाऱ्या विविध परवानगी प्रकरणांत एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीकोनातून शासन स्तरावर एक संगणकीय आज्ञावली (Portal) व या प्रयोजनासाठी विभागाचे संकेतस्थळ (Building Plan Management System) तयार करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या निर्णयास अनुसरुन शासन स्तरावरील संगणकीय आज्ञावली व विभागाचे संकेतस्थळ विकसित करण्यासाठी सल्लागार संस्था म्हणून KPMG Advisory Services Pvt. Ltd., Mahalaxmi, Mumbai या संस्थेची नियुक्ती करण्यात आलेली आहे. Maharashtra Information Technology Corporation (MIT) संस्थेने Building Plan Management System सर्व नगरपरिषदांना उपलब्ध करुन देण्याचे ठरवून ते काम n(Code) Solution Pvt. Ltd. या संस्थेस देण्यात आलेले आहे. या संस्थेने नगरपरिषदांना बांधकाम परवानगी देण्याच्या प्रक्रियेसाठी संगणकीय आज्ञावली तयार केली आहे. नगरपालिका स्तरावर बांधकाम परवानगी देण्याच्या संगणकीय प्रक्रियेबाबत अंमलबजावणी करणे सुकर होण्यासाठी खालीलप्रमाणे संबंधीत विभागाने कार्यवाही करण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

**अ) संगणकीय बांधकाम प्रणाली / आज्ञावली साठी लागणाऱ्या मनुष्य बळ / Manpower बाबत -**

i) n(Code) Solution Pvt. Ltd. या संस्थेमार्फत Building Plan Management System (BPMS) अंतर्गत सर्व प्रकारचे IT solution, customization, configuration इत्यादी प्रकारची वेळोवेळी उपलब्ध होणारी कामे पार पाडावयाची आहेत. व्यवस्थापक, MahaIT यांच्या निर्देशानुसार सदर संस्थेने Building Plan Management System बाबत सर्व कार्यवाही करावी.

ii) सर्व नगरपरिषदांमध्ये उक्त संगणकीय आज्ञावलीच्या अंमलबजावणीसाठी यापूर्वी माहिती व तंत्रज्ञान विभागाने मान्यता दिल्याप्रमाणे मनुष्य बळ हे Maharashtra Information Technology Corporation (MIT) हे त्यांच्याकडील empanel agency मार्फत पुरविणार आहे. तेव्हा संबंधित संगणकीय प्रणालीची माहिती असलेले प्रत्येक नगरपरिषदेला २ याप्रमाणे मनुष्य बळ MIT संस्थेने empanel agency उपलब्ध करुन द्यावे, अशा प्रकारचे निर्देश निर्गमित करणे / सूचना देणे /

work order देणे इत्यादींबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना माहिती व तंत्रज्ञान विभागाने संबंधित संस्थेला द्याव्यात.

iii) उक्तप्रमाणे उपलब्ध होणारे २ मनुष्य बळ हे प्रथम व दुसऱ्या वर्षासाठी राहतील. तिसऱ्या वर्षापासून १ मनुष्य बळ उपलब्ध राहील. तसेच उक्त संगणकीय बांधकाम प्रणाली व्यतिरिक्त राज्य शासनाचे नगरपरिषदेच्या संबंधित असलेले इतर (e-governance) बाबतची सर्व कामे देखील उक्त संस्थेकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या मनुष्य बळाकडून करुन घेण्यात येतील. या मनुष्य बळाचा खर्च नगरपरिषदेमार्फत चौदाव्या वित्त आयोगाकडून नियोजन प्राधिकरणांना उपलब्ध होणाऱ्या निधीतून तसेच काही प्रमाणात प्रत्येक बांधकाम परवानगी प्रकरणावर अतिरिक्त शुल्क आकारुन त्याआधारे करण्यात येईल.

**ब) Payment Gateway, SMS Gateway, Email Gateway** - उक्त संगणकीय बांधकाम प्रणाली / आज्ञावली साठी Payment Gateway, SMS Gateway, Email Gateway बाबतच्या सर्व सेवा यापूर्वी माहिती व तंत्रज्ञान विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार महा ऑनलाईन कंपनीने उपलब्ध करुन देण्यात याव्यात. यापैकी **Payment Gateway** will be provided by MIT / DIT through mahaonline. Charges for **SMS Gateway / Email Gateway** shall be actual and as per mahaonline agreed rate with DIT or MIT. सदर खर्च नगरपरिषदेमार्फत चौदाव्या वित्त आयोगाकडून नियोजन प्राधिकरणांना उपलब्ध होणाऱ्या निधीतून तसेच काही प्रमाणात प्रत्येक बांधकाम परवानगी प्रकरणावर अतिरिक्त शुल्क आकारुन त्याआधारे करण्यात येईल.

**क) Collection of payment** - Collection of all the payment will be collected in Escrow account of mahaonline and would be transferred to respective Councils, which will be facilitated by mahaonline and n(Code) Solutions Pvt. Ltd. as agreed with MIT or DIT.

**ड) Hosting बाबत** - सर्व नगरपरिषदांसाठी उपलब्ध करुन देण्यात येणारे बांधकाम परवानगी प्रकरणाची संगणकीय आज्ञावली प्रणालीवरील संपूर्ण माहिती ही राज्य स्तरावर State Data Centre येथील सर्व्हरवर उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी n(Code) Solutions कंपनीने SDC व DIT यांच्यासोबत संपर्क करुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

**ई) विभागीय स्तरावर नगरपरिषदांसाठी अभ्यासशाळा** - नगरपरिषद स्तरावर उपरोक्तप्रमाणे बांधकाम परवानगी प्रकरणांसाठी संगणकीय प्रणाली सुरु करण्यापूर्वी सर्व नगरपरिषदांमधील नगर रचनाकार / अभियंते यांना प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते. सदर प्रशिक्षण प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त यांनी विभागीय स्तरावर विभागातील सर्व जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या नगरपरिषदांसाठी आयोजित करावे. सदर प्रशिक्षण n(Code) Solutions कंपनीमार्फत देण्यात येईल.

**फ) बांधकाम नकाशांचे डिजीटल कॉपीमध्ये सादरीकरण** - नगरपालिका स्तरावर उक्त प्रणाली सुरु झाल्यानंतर प्रत्येक बांधकाम नकाशे हे CAD Drawing मध्ये तयार करणे व त्याप्रमाणे वास्तुविशारद यांच्याकडून स्विकारणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI

(संजय सावजी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीकरिता व उचित कार्यवाहीकरिता:-**

१) प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/-आपणास विनंती करण्यात येते की उक्त प्रमाणे उचित कार्यवाही आपल्यास्तरावर तातडीने करण्यात यावी ही विनंती.

३) संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.

/-आपणास विनंती करण्यात येते की आपलेस्तरावरुन सर्व नगरपालिकांना उक्त शासन निर्णयाची प्रत पाठविण्यात येऊन त्यानुसार उचित कार्यवाही करण्याच्या सूचना निर्गमित कराव्यात.

४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

५) विभागीय आयुक्त, नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नाशिक / पुणे / कोकण.

६) सह संचालक, नगर रचना, नागपूर / अमरावती / औरंगाबाद / नाशिक / पुणे / कोकण.

७) मुख्याधिकारी नगरपालिका -------

८) Managing Director, n(Code) Solution Pvt. Ltd.

९) Managing Director, KPMG Advisory Service Private Limited.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते